युएलपी.०५/२०२०　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　नि.क्र.यु—१४

साक्षदाराची सरतपास शपथेवर सुरू श्री जे. एम. पाटील  विधीज्ञ मार्फत अर्जदारातर्फे :—

माझे नाव　:　लटारी सिताराम मडावी

वय　:　६५ वर्ष

धंदा　:　लोहार काम

रा.　:　आर्वी, ता. राजुरा, जि. चंद्रपुर

आज मी माझे ओळखपत्र म्हणुन माझे आधार कार्ड ची मुळ प्रत सोबत आणली असुन त्याची मुळ प्रतिवरून पडताळणी केलेली प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास नि.क्र.यु—१६ देण्यात येते. मी २ वर्षा आधी सिन्हाळा येथे गेलो होतो. मी सिन्हाळा येथे कधी गेलो होतो व कधी आलो ती तारीख मला आठवत नाही. त्यावेळेस सिन्हाळा वरून चुंद्रपुर येथे परत येत असतांना आमच्या गाडी ची तपासणी करण्यात आली होती. सदर बस ही सिन्हाळा वरून निघाल्यानंतर दुर्गापुर नाल्याजवळ तपासण्यात आली होती. सदर बस तपासणीच्या वेळेस मी व माझी पत्नी गाडीमध्ये वेगवेगळे बसलो होतो, त्यावेळेस आमच्याकडे म्हणजेच माझया पत्नीकडे तीचे एकच तिकीट निघाले, त्यावेळेस तपासणीकांनी माझयाकडे तीकीट न आढल्यामुळे दंड भरण्यास सांगितले व त्यानुसार मी दंडाची रक्कम रू.१२०/— ची भरणा केली. सदर दंडाच्या रकमे सोबतच तिकीटाची रक्कम घेतली होती व सदर तिकीट कार्यालयीन कामाकरीता जप्त केली. मी तिकिट न घेण्याचे कारण मी सांगु शकत नाही. सिन्हाळा वरून गाडी निघाल्यानंतर वाहकाने तिकीट घेण्याबाबत प्रवाशांना सांगितले परंतु मला चक्कर येत असल्यामुळे ते मला समजले नाही. सदर बस हि चंद्रपुर बस स्टॅंड वरून

४ किलोमीटर आधी तपासण्यात आली. माझया पत्नीने तिकीट घेतले आहे असे समजुन मी तीकीट घेतले नाही.

<u>उलट–तपास श्री देशपांडे विधीज्ञ मार्फत गैरअर्जदारातर्फे</u> :–

हे म्हणणे खरे आहे की सदर दिवशी वाहकाने मला तिकीट दिले नव्हते माझ्या पत्नीला तिकीट दिले होते.

<u>फेर तपास</u> – <u>काही नाही</u>

माझे समक्ष

स्वाक्षरी/–

(श्रीमती रू.वि. मेटे)

चंद्रपुर.
न्यायाधीश,

दि.०३.०४.२०२३.
कामगार न्यायालय, चंद्रपुर